महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ❖ २१ एप्रिल २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २९२❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## किसन नावाने बोलवणारी माणसे कमी झाल्याची खंत

### आ. किसन कथोरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



बदलापूर: गावातील शिकलेल्या तरुणाला सरपंच करण्याचा हट्ट संपूर्ण गावाने केला आणि गावाच्या एकोप्यामुळे बिनविरोध सरपंच होण्याचा मान सलग तीन वेळा मिळाला. यादरम्यान जो मित्रपरिवार तयार झाला ते आपल्याला हक्काने' आपला किसन' म्हणून हाक मारत होते. किसन ते आमदार हा प्रवास यशाचा प्रवास असला तरी आपुलकीने किसन म्हणून हाक मारणारी माणसे कमी झाल्यामुळे काहीशी खंत मनात राहते.

बारवी धरणाच्या प्रकल्पात गाव आणि जागा धरणात गेल्यामुळे गाव स्थलांतरित करावे लागले. प्रकल्पग्रस्त म्हणून ज्या ठिकाणी गाव स्थलांतरित करण्यात आले त्या ठिकाणाहून शिक्षण घेणे अवघड होते. आठ ते नऊ किलोमीटरचा पायी प्रवास करून शाळेपर्यंत पोहोचण्याचा संघर्ष आजही आठवतो. कोणतीही साधने नसताना त्या अवघड परिस्थितीत अकरावी पर्यंतचे शिक्षण आई-वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी केले. शालेय शिक्षण पूर्ण करण्यासाठी केवळ आई-वडीलच नाही तर एकत्रित कुटुंबात राहणाऱ्या प्रत्येकाने सहकार्य केले. गावासाठी काहीतरी करावं ही मनात जिद्द असल्यामुळेच आपल्याला पहिल्याच प्रयत्नात यश मिळाले. त्यानंतर सरपंच, सरपंच संघटनेचे अध्यक्ष पद, पंचायत समिती सदस्य, पंचायत समिती सभापती पद, त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य आणि जिल्हा परिषद अध्यक्ष असा प्रवास अखंडितपणे सुरू राहिला आणि त्यानंतर सलग पाच वेळा आमदार होण्याचा मान देखील मिळाला. या प्रवासाच्या दरम्यान नातेवाईकांच्या ओळखीतच कमल (नानी) तिच्यासोबत विवाह झाला. अत्यंत धार्मिक कुटुंबातून आलेल्या आपल्या पत्नीमुळे आपण देखील विकास कामांना श्रद्धेचे स्वरूप दिले. व्यक्ती म्हणून नव्हे तर विकास कामांमुळे आपली ओळख निर्माण व्हावी ही पत्नीची देखील इच्छा सार्थकी लागली. सामाजिक आणि राजकीय काम करत असताना कुटुंबाची सर्व जबाबदारी पत्नीने चोख निभावली.

• **आपली श्रीमंती म्हणजे दाराबाहेरील चपला:** सकाळ आणि संध्याकाळ सर्वसामान्य नागरिकांना आवर्जून वेळ देण्याची सवय पूर्वीपासूनच होती. सकाळी समस्या मांडण्यासाठी येणाऱ्यांची संख्या कधीही घटली नाही. मी स्वतःची श्रीमंती मोजत असताना आपल्या दाराबाहेर किती लोकांच्या चपला आहेत त्यावरूनच आपल्या श्रीमंतीचा अंदाज लावत आलो आहे आणि तो अंदाज आजपर्यंत कमी झालेला नाही.

• **राजकारण चुकीच्या दिशेने जाते:** आपण राजकारणात सक्रिय असलो तरी हल्लीच राजकारण हे चुकीच्या दिशेने जात आहे. सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्याचं पूर्वीच राजकारण आणि आत्ताच आर्थिक लोभाचे राजकारण हे दोन्ही पर्व आपण पाहिले आहेत. जात आणि धर्मामध्ये राजकारण गुंतत चालला आहे हे अत्यंत चुकीचं आहे.

• **कुटुंबासाठी वेळ काढावा लागतो:** आपण ज्या क्षेत्रात काम करीत आहोत त्या क्षेत्रातून आपल्याला आपल्याच कुटुंबासाठी वेळ देता येत नाही. मात्र आता वेळ मिळत नसला तरी कुटुंबासाठी वेळ काढण्याची सवय लावून घेतली आहे.

• **मित्रांसह भटकंती:** कुठेही फिरण्यासाठी आपण आपला मित्र परिवाराला सोबत घेतो. मित्रांचे कुटुंब एकत्रित करून आवर्जून वर्षातून दोन वेळा तरी फिरायला जाण्याचा प्रयत्न करतो.

## दोन्ही पवार एकत्र येण्याचे संकेत !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : मनसे पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आमची भांडणं छोटी आहेत, महाराष्ट्र मोठा आहे, असं म्हणत भविष्यात उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती होऊ शकते, अशी भावना व्यक्त केलीय. त्याला खुद्द उद्धव ठाकरे यांनीच सकारात्मक प्रतिसाद दिलाय. असे असतानाच आता पवार घराणेही एकत्र येण्यासंदर्भात चर्चा चालू झाली आहे. कारण याच घराण्यातील एका बड्या नेत्याने अप्रत्यक्षपणे अजितदादांना एकत्र येण्याचं आवाहन केलंय.

**सर्वच कुटुंबांनी एकत्र यावं- रोहित पवार**

पवार घराण्यातील बडे नेते तथा आमदार रोहित पवार यांनी एक एक्स या समाजमाध्यमावर त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी एक ट्वीट केलंय. विशेष म्हणजे आपली ही पोस्ट त्यांनी अजित पवार यांना टॅग केली आहे. अजित पवार यांचा उल्लेख न करता त्यांनी सर्वच कुटुंबांनी एकत्र यायला हवं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीच्या चर्चेनंतर रोहित पवार यांनी या भावना व्यक्त केल्या आहेत.

**रोहित पवार यांनी नेमकं काय म्हटलंय?**

रोहित पवार यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीवर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. "मराठी अस्मितेला नख लावू पाहणाऱ्या महाराष्ट्रद्रोही शक्तीच्या विरोधात ठाकरे कुटुंब एकत्र येत असेल, तर मराठी मनासाठी हा सुवर्णक्षण असेल. केवळ ठाकरे कुटुंबानेच नाही तर सर्वच कुटुंबांनी महाराष्ट्रधर्म जपण्यासाठी एकत्र यायला हवं आणि यातच महाराष्ट्राचं हीत आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत. तसेच सर्वच कुटुंबांनी या शब्दावर त्यांनी हॅशटॅग लावत विशेष जोर दिला आहे. सोबतच या पोस्टमद्ये त्यांनी शरद पवार, अजित पवार यांनाही टॅग केलंय. त्यामुळे रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार शरद पवार यांना एकत्र येण्याचंच आवाहन केल्याचं म्हटलं जात आहे.

**सुप्रिया सुळे यांचेही सूचक विधान**

सुप्रिया सुळे यांनीदेखील पवार कुटुंब एकत्र येणार का? या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. पत्रकारांनी विचारलेल्या या प्रश्नाचे उत्तर देताना 'पांडुरंगाची इच्छा आहे. नातेसंबंध माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत आजही आणि उद्याही,' असे सूचक विधान सुप्रिया सुळे यांनी केले आहे.

दरम्यान, आता रोहित पवार यांच्या या ट्वीटचे वेगवेगळे अर्थ काढले जात असले तरी ठाकरे बंधूंसोबतच भविष्यात राजकीय दृष्टीकोनातून पवार कुटुंब एकत्र येणार का? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## आरोग्य अधिकाऱ्यांना सीपीआर प्रशिक्षण

### ठाणे जिल्ह्यात हृदयविकारग्रस्तांना जीवनदान देण्याचा संकल्प

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : सद्यस्थितीत वाढत्या हृदयविकाराच्या घटनांमुळे अनेकांना प्राण गमवावे लागत आहेत. हृदयविकाराच्या झटक्यामुळे अचानक हृदयक्रिया बंद झाल्यास रुग्णाला तत्काळ CPR (Cardio Pulmonary Resuscitation) मिळाल्यास त्याचा जीव वाचू शकतो. हाच महत्वाचा उद्देश समोर ठेवून ठाणे जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने CPR प्रशिक्षण मोहीम राबवली जात आहे.

ही मोहीम आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहे.

**प्रशिक्षणाचे टप्पे:**

टप्पा 1: 7 एप्रिल 2025 रोजी मा. आरोग्यमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि इतर जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर यांच्या मार्फत दृकश्राव्य माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले.

टप्पा 2: 8 एप्रिल 2025 रोजी सर्व वैद्यकीय अधिकारी आणि समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

टप्पा 3: तालुका स्तरावरील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

टप्पा 4: प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत आशा व अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण दिलं जाईल.

टप्पा 5: प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी शाळा आणि महाविद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थ्यांना CPR चे प्रशिक्षण देतील.

टप्पा 6: VHNSC सदस्य, जन आरोग्य समिती सदस्य आणि सामान्य नागरिकांनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून हृदयविकारामुळे होणारे मृत्यू कमी करणे आणि आपत्कालीन प्रसंगी तत्काळ मदतीचा हात देणे हा उद्देश आहे.

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांना राज्यस्तरीय गुणवंत अधिकारी पुरस्कार जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत सन २०२२-२३ या वर्षासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येतो. यामध्ये ठाणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश अंकुश फडतरे यांची निवड राज्यस्तरीय गुणवंत अधिकारी पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. या यशाबद्दल जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगर पालिका आयुक्त कैलास शिंदे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

फडतरे यांनी जिल्हा परिषद सातारा येथे काम करत असताना कोविड काळात उत्कृष्ट कामकाज केले आहे. ग्रामपंचायत भवन बांधकाम, पाणी पुरवठा योजना, उपजीविका अभियान, जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, पथदिवे योजना, विविध इमारत बांधकाम योजना, रोजगार हमी योजना, तसेच पंचायत राज यंत्रणेच्या डिजिटलायझेशन अशा अनेक विभागांमध्ये प्रभावी अंमलबजावणी केली आहे. त्यांच्या पारदर्शक प्रशासकीय प्रक्रियेतील योगदान, व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणासाठी केलेले कार्य यामुळे त्यांना हा सन्मान प्राप्त झाला आहे.

## शहापूरात वीज वितरणचा भोंगळ कारभार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**ऐन उन्हाळ्यातील विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण**

शहापूर : शहापूर तालुक्यात विज जाण्याचे प्रमाण वाढले असून यामुळे गाव व शहरातील नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत.ऐन उन्हाळ्यात वारंवार वीज खंडीत होत असते. झाडे तोडणीचे काम अथवा लाईन मेंटेनन्सचे काम असले तरी वीज ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना दिली जात नसल्याने नागरिक वीज वितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात संताप व्यक्त करत आहेत.

शहापुरसह परिसरात तसेच किन्हवली, डोळखांब,वाशिंद, नडगाव आदि ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे.पावसाळ्याला अजून सुरुवात झाली नसतांना वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. विजेचा लंपडाव सुरु असताना वीज देयक मात्र ठरल्याप्रमाणे येते आणि ते भरावेच लागते. त्यामुळे,महावितरणने तातडीने लक्ष देऊन ग्रामीण भागात वीजपुरवठा अखंडित सुरू ठेवावा.नागरिकांवर आंदोलनाची वेळ आणू नये,अशी मागणी जोर धरू लागली आहे.दरम्यान सध्या लग्न सराईचे दिवस सुरु आहेत.या आनंदाच्या सोहळ्यावेळी वारंवार लाईट जाण्याचे प्रकार वाढले आहेत.तालुक्याच्या ग्रामीण भागातील वाड्यावस्त्यांवर वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार सुरू झाला आहे. वीजवाहिन्या अत्यंत जुन्या झाल्याने केव्हाही तुटतात. ट्रान्सफॉर्मरमध्ये दोष निर्माण होऊन केव्हाही वीज जाते. वीज गेल्यानंतर नागरिक तक्रार देतात. परंतु,त्याची महावितरणाचे कर्मचारी तातडीने दखल घेत नाही.त्यामुळे, वीज गेल्यानंतर ती केव्हा येईल याची खात्री नसल्याने वाड्यावस्त्यावरील नागरिकांना अंधारातच रात्र काढावी लागत आहे. शिवाय कर्मचारी वर्ग कमी असल्याने हजर असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येत आहे. शिवाय त्यांना नागरिकांच्या रोशाला सामोरे जावे लागत आहे.




## पेसा व बिगर पेसा क्षेत्रात शिक्षकांची पदे रिक्त

### झेडपीच्या शाळा भाषा व विज्ञान शिक्षकांच्या प्रतीक्षेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**शिक्षक सेनेने घेतला पाठपुरावा**

शहापूर: जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या पेसा व बिगर पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये विज्ञान व भाषा विषय पदवीधर शिक्षक यांची शेकडो पदे रिक्त आहेत. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत असून सदर पदे तत्काळ भरावी तसेच मार्च २०२५ मध्ये जाहीर झालेला जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीतील देय असलेला महागाई भत्ता फरक अदा करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष राजेश वेखंडे यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी कल्याण तालुका अध्यक्ष महेंद्र खैरनार व शिक्षक सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

इयत्ता सहावी ते आठवी करिता विषय पदवीधर शिक्षकांची पदे पेसा व बिगर पेसा क्षेत्रात अनेक पदे रिक्त आहेत.त्यामुळे भाषा व विज्ञान या विषय शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, शैक्षणिक गुणवत्तेवर देखील त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे राजेश वेखंडे यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.तसेच मार्च २०२५ मध्ये जाहीर झालेला जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीतील देय असलेला महागाई भत्ता फरक अदा करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष राजेश वेखंडे यांनी केली आहे.

> पेसा व नॉन पेसा क्षेत्रातील भाषा व विज्ञान विषयाच्या सर्व रिक्त जागा पदवीधर वेतनोत्ती देताना नॉन पेसा म्हणजेच कल्याण,अंबरनाथ या तालुक्यांचा नक्की विचार केला जाईल तसेच महागाई भत्ता फरक बिलाची तरतूद उपलब्ध असून महागाई भत्ता फरक बील पुढील आठवड्यात अप्राप्त शिक्षकांच्या खात्यावर जमा होईल.
> – बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, ठाणे.

## उल्हास प्रभात राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



बदलापूर : बदलापूर मधून 31 वर्षापासून प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र उल्हास प्रभात चा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा नुकतेच संपन्न झाला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे, बदलापूर-अंबरनाथ बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष संजय जाधव, सकाळचे मुख्य संपादक राहुल गडपाले, उल्हास प्रभातचे संपादक डॉ. श्री. गुरुनाथ बनोटे यांच्यासह विशेष पुरस्कार विजेते चंद्रकांत खडकबाण, कैलास मनोरे, रवी कुंभार, गजानन टोहके, एड. संतोष मळवीकर, देवेसिंग राजपूत, डॉ. चित्रलेखा माने व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या राज्यभरातील 70 जणांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षीय भाषणात आमदार किसन कथोरे यांनी सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे कौतुक करत अशी व्यक्तिमत्व समाजासमोर आणण्याचे काम करणाऱ्या उल्हास प्रभात चे संपादक डॉ. गुरुनाथ बनोटे यांचे कौतुक केले.गेली 12 वर्षापासून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाज रत्न, आरोग्य रत्न, शिक्षण रत्न अशा विविध प्रकारचे पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. राज्यभरातून आलेल्या दिवाळी अंकांमधून 13 दिवाळी अंक निवडण्यात आले यामध्ये प्रथम क्रमांक अवतरण सकाळ मुंबई, द्वितीय क्रमांक उद्याचा मराठवाडा नांदेड, तृतीय क्रमांक अपेक्षा कोथरूड पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक फोर्ट ट्रस्ट कामगार मुंबई ,सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक वेदांत श्री पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक जमाना धमाका अहमदनगर, रणांगण नवी मुंबई, नृत्यवकाश पुणे, साहित्य सवाना नाशिक, सुभाषित नाशिक , पुरुष स्पंदन मुंबई, अर्थशक्ती मुलुंड यांना उत्कृष्ट व सर्वोत्कृष्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश दामोदरे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना आरती नेरपगार यांनी केले या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत सुगंधा बनोटे, सहसंपादक अतुल नेरपगार, गौरव बनोटे, गुरुनाथ तिरपनकर, प्रमोद हरपुडे, सौरभ बनोटे, भावेश चंद्रा आदींनी अथक परिश्रम घेऊन हा कार्यक्रम पार पडला. हा सोहळा काटदरे मंगल कार्यालयात पार पडला.

# गीतासार



### अध्याय ८
### अक्षरब्रह्मयोगः

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् । यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ ८-२१ ॥

त्याला अव्यक्त, अक्षर असे म्हणतात. त्यालाच श्रेष्ठ गती म्हणतात. ज्या सनातन अव्यक्त भावाला प्राप्त झाल्यावर मनुष्य परत येत नाही, ते माझे सर्वश्रेष्ठ स्थान होय. ॥ ८-२१ ॥

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया । यस्यान्तः स्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ ८-२२ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), ज्या परमात्म्याच्या ठिकाणी सर्व भूते आहेत आणि ज्या सच्चिदानंदघन परमात्म्याने हे सर्व जग व्यापले आहे, तो सनातन अव्यक्त परम पुरुष अनन्य भक्तीनेच प्राप्त होणारा आहे. ॥ ८-२२ ॥

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः । प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ ८-२३ ॥

हे भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना, ज्या काळी शरीराचा त्याग करून गेलेले योगी परत जन्माला न येणाऱ्या गतीला प्राप्त होतात आणि ज्या काळी गेलेले परत जन्माला येणाऱ्या गतीला प्राप्त होतात, तो काळ अर्थात दोन मार्ग मी सांगेन. ॥ ८-२३ ॥


अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् । तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ ८-२४ ॥

ज्या मार्गात ज्योतिर्मय अग्नीची अभिमानी देवता आहे, दिवसाची अभिमानी देवता आहे, शुक्लपक्षाची अभिमानी देवता आहे आणि उत्तरायणाच्या सहा महिन्यांची अभिमानी देवता आहे, त्या मार्गात मेल्यावर गेलेले ब्रह्मज्ञानी योगी वरील देवतांकडून क्रमाने नेले जाऊन ब्रह्माला प्राप्त होतात. ॥ ८-२४ ॥

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् । तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ ८-२५ ॥

ज्या मार्गात धुराची अभिमानी देवता आहे, रात्रीची अभिमानी देवता आहे, कृष्णपक्षाची अभिमानी देवता आहे आणि दक्षिणायनाच्या सहा महिन्यांची अभिमानी देवता आहे, त्या मार्गात मेल्यावर गेलेला सकाम कर्म करणारा योगी वरील देवतांकडून नेला जातो. पुढे तो चंद्रतेजाला प्राप्त होऊन स्वर्गात आपल्या शुभ कर्मांची फळे भोगून परत येतो. ॥ ८-२५ ॥

## रेसिपी
# गाजराचा ढोकळा



**साहित्य**

किसलेला गाजर - 1 वाटी,तांदळाचे पीठ - 1 वाटी,दही - अर्धी वाटी,पाणी - अर्धा वाटी,,बेकिंग सोडा,हिरवी मिरची आणि आल्याची पेस्ट - 1 चमचा,लाल तिखट,हळद,जिरं, मोहरी - अर्धा चमचा,,साखर - 2 चमचे मीठ,तेल

**कृती**

किसलेल्या गाजरातील पाणी पूर्णपणे काढून घ्या.यानंतर एका भांड्यात तांदळाचे पीठ, दही, साखर, मीठ, हळद, हिरवी मिरची, आल्याची पेस्ट एकजीव करून घ्या. तयार मिश्रणात किसलेले गाजर, बेंकिग सोडा आणि तेल मिक्स करा.यानंतर ज्यामध्ये ढोकळा बनवणार आहात, त्या ट्रे ला तेल लावून घ्या.एका भांड्यात पाणी गरम करा आणि त्यावर तेल लावलेला ट्रे त्यावर ठेवा. ट्रे मध्ये बॅटर ओता.20 ते 25 मिनिटे मिश्रण शिजवून घ्या.सर्वात शेवटी फोडणी पात्रात जिरं, मोहरी, लाल तिखट टाकून फोडणी बनवून घ्या.तयार फोडणी शिजलेल्या ढोकळ्यावर टाका.तुमचा हेल्दी गाजराचा ढोकळा तयार झाला आहे.

## तेथे कर माझे जुळती

# हुतात्मा अनंत कान्हेरे



**(७ जानेवारी १८९२- १९ एप्रिल १९१०)**

1 ऑगस्ट 1920 रोजी लोकमान्य टिळक यांच्या निधना बरोबरच टिळक युगाचा अस्त झाला. तत्पूर्वी त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात राष्ट्रवादी अथवा क्रांतिकारी लोक कार्यप्रवण झाले होते. पुण्यातून त्यांचा केसरी गर्जना करीत होता. क्रांतिकारकांच्या गुप्त संस्था त्याकाळी स्थापन झाल्या आणि दडपशाही करणाऱ्या अधिकाऱ्यांचे खून पाडण्याचे प्रयत्न सुरू झाले नाशिकचा कलेक्टर आर्थर मॅसन टिपेट्स जॅक्सन हा अत्यंत खूनशी मनोवृत्तीचा होता. मिरवणुकीत' वंदे मातरम्' म्हणण्यास प्रतिबंध करणारा हुकूम त्याने काढला होता. तसेच घोषणा देणाऱ्या युवकांवर ही त्याने खटले भरले .अन्याय अत्याचार करणाऱ्या कलेक्टर जॅक्सन चा काटा अनंत कान्हेरे यांनी कसा काढला त्याची ही कहाणी.

हुतात्मा अनंत कान्हेरे यांचा जन्म दिनांक 7 जानेवारी 1892 रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील आयनी मेटे या गावी झाला .त्यांचे प्राथमिक शिक्षण इंदूर येथे तर माध्यमिक शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथे झाले. औरंगाबाद येथे जाऊन अभियांत्रिकी शिक्षण घ्यायचे त्यांनी ठरवले होते. तथापि भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ते क्रांतिकारी गटाच्या कार्याकडे आकर्षित झाले. ते गणेश दामोदर सावरकर आणि विनायक दामोदर सावरकर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या ,'अभिनव भारत 'या क्रांतिकारक संघटनेचे सदस्य झाले .सावरकर बंधू आणि मदनलाल धिंग्रा यांच्याकडून त्यांनी स्फूर्ती घेतली.

त्याकाळी श्री बाबासाहेब खरे हे ज्येष्ठ वकील राजद्रोह पसरवितात म्हणून त्यांची वकिलीची सनद काढून त्यांचे माकोसा वतन जप्त करण्याची कारवाई ब्रिटिश सरकारने केली .तसेच आपली घोडागाडी पुढे जाऊ दिली नाही म्हणून विल्यम्स या गोऱ्या इंजिनियरने बापू सिंग नावाच्या एका बैलगाडी वाल्याला लाथा बुक्क्यांनी मारले आणि पुढे बैलगाडीवाला मरण पावला तरीदेखील जॅक्सन ने विल्यम्सला निर्दोष सोडले .या आणि अशा प्रकारच्या अनेक कृत्यांनी क्रांतिकारक संतापले होते .8 जून 1909 ला स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्या आक्षेपार्ह कविता प्रकाशित केल्या म्हणून बाबासाहेबांना हातापायात बेड्या घालून पोलिसांनी त्यांची धिंड काढली. तर जॅक्सनने त्यांना जन्मठेपेची शिक्षा दिली. तेव्हा जॅक्सनला नाशिक मधून जिवंत जाऊ द्यायचे नाही, असा अण्णा कर्वे व विनायकराव देशपांडे यांनी कट रचला. या कटात कोवळ्या वयातील तरुण अनंत कान्हेरे हे सामील झाले. अनंत उत्तम नेमबाज होते तसेच निधड्या छातीचे क्रांतिकारक होते .21 डिसेंबर 1909 ला विनायकराव अनंत कान्हेरे यांना घेऊन नाशिकला गेले. ते कर्वे यांच्या घरी राहिले. त्यांनी कान्हेरे यांना एक भरलेले पिस्तूल दिले .खुनास खून! जुलमाचा प्रतिकार जुलूम !असे निवेदन देखील कान्हेरे यांनी स्वहस्ताक्षरात लिहिले. जॅक्सनला मारल्यानंतर लगेच विष खाऊन आत्महत्या करायची अशी त्यांची योजना होती. त्यादिवशी सायंकाळी किर्लोस्कर मंडळींचे संगीत शारदा हे नाटक होते .त्यात तरुण बालगंधर्वांची शारदेची भूमिका होती .जॅक्सनला चांगले मराठी समजत असल्यामुळे कंपनीने त्याला आग्रह पूर्वक बोलाविले होते. कंपनी त्यांचा सत्कार करणार होती सदर नाटक पाहण्यासाठी कान्हेरे यांनी कोटाच्या खिशात आपले पिस्तूल टाकले व ते टोपी न घालताच धोतराचा काचा मारून नाट्यगृहात शिरले. जॅक्सनच्या मागील खुर्चीवर कर्वे व देशपांडे बसलेले त्यांनी पाहिले .जॅक्सन जरा उशिराच नाट्यगृहात आला .कान्हेरे तयार होऊन बसले होते. व्यासपीठावर कोदंडाचे गाणे चालले होते. पापी जॅक्सनचा नाट्यगृहात प्रवेश झाला . तो पायऱ्या उतरताना त्याची पाठ कान्हेरे यांच्याकडे होताच त्यांनी पहिली गोळी झाडली पण ती चुकली .तात्काळ कान्हेरे तीरासारखे धावले व त्यांनी पुढूनच जॅक्सन वर लागोपाठ चार गोळ्या झाडल्या. जॅक्सन रक्ताच्या थारोळ्यात रोळ्यात पडला. पळशीकर मामलेदारांनी त्यांच्या डोक्यावर काठी मारली .हातात भरलेले पिस्तूल असतानाही पळशीकरांनी कान्हेर्यांना जीवदान दिले होते. पोलिसांनी कान्हेरे यांना पकडले .कर्वे व देशपांडे यांनीही आपण कटात सहभागी असल्याचे कबूल केले .7 मार्चला मुंबईच्या उच्च न्यायालयात दोन युरोपियन व एक मवाळपक्षीय न्यायाधीश चंदावरकर यांच्यापुढे हा खटला सुरू झाला 20 मार्चला त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली .18 एप्रिल रोजी त्यांना ठाण्यात नेण्यात आले .आणि 19 एप्रिल 1910 रोजी सकाळी 7 वाजता त्या तिघांना फाशी देण्यातआले. तिघांनी भारत भूमीचा निरोप घेतला.

धन्य त्यांची देश निष्ठा!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# भारताचे मुख्य सर न्यायाधीश भूषण गवई



महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई हे लवकरच भारताचे नवे मुख्य सर न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून १४ मे पासून ते भारताचे मुख्य सर न्यायाधीश म्हणून सूत्र हाती घेतील. विद्यमान सर न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. न्यायमूर्ती भूषण गवई हे भारताचे ५२ वे सर न्यायाधीश असतील. याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. सॅम भरूचा, न्या. सरोश कपाडिया, न्यान शरद बोबडे, न्या. उदय लळीत, आणि न्या. धनंजय चंद्रचूड या सात मराठी न्यायमूर्तींना हा मान मिळाला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांना भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु या पुढील महिन्यात १४ तारखेला सर न्यायाधीशपदाची शपथ देतील त्यावेळी इतिहास रचला जाईल. भारताचे सर न्यायाधीश म्हणून शपथ घेणारे भूषण गवई हे केवळ दुसरेच दलीत न्यायमूर्ती आहेत याआधी के जी बालकृष्णन पहिले दलीत सर न्यायाधीश बनले होते. न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाच्या सर न्यायाधीशपदी नियुक्ती होणे हा महाराष्ट्राचा बहुमान होय कारण ते महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. रीपाई नेते व माजी राज्यपाल रा सू गवई यांचे सुपुत्र असलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावतीत झाला असून त्यांचे प्राथमिक व कायद्याचे शिक्षण मुंबईत झाले. मुंबईतच त्यांनी वकिली सुरू केली. २००५ मध्ये त्यांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. वकील आणि न्यायाधीश म्हणून त्यांना दांडगा अनुभव आहे. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पणजी येथे त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले आहे. २४ मे २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून नियुक्ती झाली. अनेक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिले आहेत. नोटबंदी वैध ठरवणारा २०२३ चा निर्णय त्यांच्या कारकिर्दीतील महत्वाचा निर्णय ठरला. जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवण्याचा निर्णय देणाऱ्या घटना पिठाचा ते भाग होते. प्रशांत भूषण अवमान प्रकरणात निकाल देणाऱ्या खंडपीठाचाही ते भाग होते. कायद्याचे सखोल ज्ञान, सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कौशल्य, नेतृत्वगुण, वंचित आणि उपेक्षितांबद्दलचा कळवला या गुणांमुळे ते आधीच लोकप्रिय आहेत. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या निवडीचा मराठी माणसांना अभिमान आहे. न्यायालय आणि न्यायालयीन कामकाज याविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजूनही काही प्रश्न आहेत. न्यायालयात जलद न्याय मिळत नाही, सर्वसामान्य नागरिकांनी न्यायालयाची पायरी चढूच नये अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. सर्वसामान्य नागरिकांची ही भावना खोटी ठरवून जलद न्याय देण्याबरोबरच न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास दृढ करण्याची जबाबदारी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर आहे त्यात ते यशस्वी होतील यात शंका नाही. देशाचे नवे सर न्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे मनापासून अभिनंदन!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# भारतीय नागरी सेवा दिन



दरवर्षी २१ एप्रिल रोजी भारतामध्ये नागरी सेवा दिन पाळला जातो.

प्रशासकीय सेवेत स्वत:ला सार्वजनिक सेवेसाठी समर्पित असलेल्या लोकांच्या सन्मानार्थ हा दिन साजरा केला जातो.

२१ एप्रिल १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिल्लीतील मेटकाफ हाऊसमध्ये नागरी सेवकांच्या पहिल्या गटाला संबोधित केले होते. त्या दिवसाची आठवण म्हणून २००६ पासून हा दिवस नागरी सेवा दिन म्हणून नियमितपणे साजरा होत आहे.

**भारतीय नागरी सेवा (ICS) :** भारतीय नागरी सेवेचे दोन भाग आहेत.

१) अखिल भारतीय सेवा : या सेवा तीन आहेत.

i) भारतीय प्रशासकीय सेवा (IAS)
ii) भारतीय पोलिस सेवा (IPS)
iii) भारतीय वनसेवा (IFoS)

२) केंद्रीय सेवा : यात गट अ व गट ब यात विभागलेल्या सुमारे १७ सेवा येतात. उदा. राजस्व सेवा, पोस्टल सेवा, माहिती सेवा, व्यापार सेवा इ. नागरी सेवा दिनाचा एक भाग म्हणून दरवर्षी पंतप्रधानांच्या हस्ते सार्वजनिक प्रशासनात उत्कृष्टतेसाठी पारितोषिके नागरी सेवकांना देण्यात येतात.

**राष्ट्रीय नागरी सेवा दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

राष्ट्रीय नागरी सेवा दिनाचे पहिले खाणकाम २१ एप्रिल रोजी आहे आणि ते १९४७ पासून सुरू होते जेव्हा सरदार वल्लभभाई पटेल भारताचे पहिले गृहमंत्री बनले आणि त्यांनी नवी दिल्लीतील मेटकाफ हाऊस येथे भारतीय प्रशासकीय सेवा (IAS) अधिकाऱ्यांच्या पहिल्या केडरला कुशलतेने नियुक्त केले.

पटेल यांच्या प्रोत्साहनदायक भाषणात स्वातंत्र्यानंतर देशाच्या एकता, स्थिरता आणि प्रभावी प्रशासनाची जबाबदारी घेणारे नागरी सेवक म्हणून परिभाषित केले गेले.

नागरी सेवकांना भारताची "पोलादी चौकट" असे संबोधले जात असे, ज्याने नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्राची रचना मजबूत करण्यात नागरी सेवेच्या भूमिकेवर भर दिला.

प्रशासकीय इतिहासाच्या इतिहासात भूतकाळातील सर्वात महत्त्वाच्या घटनेनुसार, भारत सरकारने जाहीर केले की यापुढे आणि २००६ पासून, २१ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय नागरी सेवा दिन म्हणून ओळखला जाईल आणि साजरा केला जाईल. खरं तर, तेव्हापासून, देशभरातील नागरी सेवकांनी दिलेल्या प्रत्येक योगदानाची दखल घेण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

अशाप्रकारे हा दिवस त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी, सर्वोत्तम पद्धतींकडे लक्ष वेधण्यासाठी आणि नागरिकांना सेवा पुरवण्यात उत्कृष्टता मिळविण्यासाठी त्यांना प्रेरित करण्यासाठी एक व्यासपीठ बनला आहे.

# आधार फाउंडेशनचा वर्धापन दिन संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** आधार फाउंडेशन सामाजिक सेवा संस्था ही मुरबाड मध्ये गेले 6 वर्ष सामाजिक सेवेचा वसा घेऊन विविध उपक्रम राबवत आहे.

वर्षभरात वृक्षारोपण व संवर्धन, रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, स्वच्छ भारत मिशन, धार्मिक उपक्रमातील सहभाग, गरीब व गरजू लोकांना आर्थिक मदत संस्थेचे सभासद स्वखर्चाने करत असतात. तसेच अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून इतर संस्थांचे कार्य समजून घेत समाजातील विविध क्षेत्रातील गुणवंताचा गौरव सुद्धा संस्था करत असते.



यावर्षी आरोग्य क्षेत्रातील डॉ. कनोजा, सामाजिक क्षेत्रात मन्सूर अली शेख, महिला सक्षमीकरण योगिता शिर्के, शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिमा नागरगोजे, कला क्षेत्रातील नितेश डोंगरे, साहित्य क्षेत्रात एकनाथ देसले, क्रीडा क्षेत्रात मदन गायकर, किन्नर समाजासाठी काम करणाऱ्या योगिता पाठारे, अध्यात्मिक क्षेत्रात ह.भ.प.धनाजी महाराज भोईर, कृषी क्षेत्रातील शेतकरी अशा विविध गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.. संस्था वाढीसाठी मुरबाड नंतर शहापूर मध्ये सुद्धा नवीन शाखेचे उद्घाटन करण्यात आले. नवनिर्वाचित अध्यक्ष भाई शेख, सचिव प्रकाश वरकुटे, उपाध्यक्ष राजेंद्र पडवळ व इतर सदस्यांची निवड करून फाउंडेशनच्या नविन शहापूर शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कमलनाथ नवनाथ महाराजांनी भुषविले. तर किशोरजी कुडव, किसनजी तारमळे, अपर्णाताई खाडे, मोहनजी भावार्थे, API अनिलजी विसपुते,API खैरनार, नरेंद्र महाराज, भगवानजी फर्डे मान्यवरांची उपस्थिती लाभली..

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष कैलास कोर यांनी केले तर दिमाखदार सूत्रसंचालन विनोद कोर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सर्व सभासदांनी विशेष मेहनत घेतली.

# दादर गावात एम.आय.डी.सीचा प्रकल्प हवा – ग्रामस्थांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** तालुक्यातील दादर गांवामध्ये सेझ कंपनी अथवा शासनाच्या भूसंपादन अधिनियमा प्रमाणे कोणताही प्रकल्प आला नाही तसेच नापीक झालेल्या जमिनींमुळे बेरोजगारीचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने शासना मार्फत एम.आय.डी.सी. सारखे प्रकल्प राबवण्यात यावे याबाबत रोजगार हमी, फलोत्पादन आणि मिठागर विकास मंत्री भरत गोगावले यांना जेष्ठ शिवसैनिक सुर्याजी नारायण पेरवी, दादरचे उपसरपंच राहूल गजानन पेरवी अॅड.स्वागत पाटील तसेच ग्रामस्थांकडून निवेदन देण्यात आले.

या निवेदनात मागणी करण्यात आली आहे की रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील दादर गावात मोठ्या प्रमाणात भातशेती केली जात होती मात्र सन १९८९ साली आलेल्या महापुरामुळे संपुर्ण दादर गावाची दुर्दशा झाली. गांवाचा संरक्षक बंधारा पुर्णपणे तुटून गेला. त्यामुळे समुद्राचे खारे पाणी भातशेतीमध्ये शिरून संपुर्ण दादर गावातील भातशेती जमीन ओसाड झालेली आहे. आज पर्यंत दादर गांवातील संरक्षक बंधा-यावर शासनाने दुरूस्तीसाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत.त्यामुळे समुद्राचे खारे पाणी शिरून दादर गांवची जमीन नापीक झालेली आहे. तसेच कोणत्याही सुविधा, योजना गांवातील लोकांपर्यंत पोहोचलेल्या नाहीत.



संपूर्ण शेती गेल्यामुळे गांवातील लोकांचा शेतीचा व्यवसाय पुर्णपणे बंद पडला. दादर गांव हे एक बेट असल्याने शेती गेल्यावर गांवातील लोकांनी मच्छी व रेती (हातपाटीची वाळू) चा व्यवसाय सुरू केला पण पाताळगंगा नदीमध्ये रसायनी मधील कंपनीचे दुषीत पाणी, रसायन युक्त पाणी या खाडीमध्ये सोडल्याने संपुर्ण खाडी देखील दुषीत झालेली आहे. पर्यायाने मच्छीचा व्यवसायतसेच वाळुची रॉयल्टीचे दर वाढविल्यामुळे तो ही व्यवसाय बंद झालेला आहे. यामुळे लोकांची उपासमारी होत आहे. दादर गांवची जमीन १८०० ते १९०० एकर असून सध्या ती पडीक जमीन झालेली आहे.

सन २००६-०७ मध्ये शासनाने मुंबई सेझचा प्रकल्प हाती घेतला आणि भूसंपादनाचे कलम ४ (१) ची आधीसुचना जाहीर केली. त्यानंतर सेझ कंपनीने दादर गांवातील काही जमीन मिळकतींचे साठेखत करून घेतले. आपल्या गांवात प्रकल्प येतो म्हणून गांवातील लोकांनी सेझ कंपनी बरोबर साठेकरार केले. परंतु जवळ जवळ १७ वर्ष पूर्ण झाली मात्र दादर गांवामध्ये सेझ कंपनीने अथवा शासनाने काढलेल्या भूसंपादनाचे अधिनियमा प्रमाणे कोणताही प्रकल्प आणलेला नाही. त्यामुळे गांवातील पीढी बेरोजगार झाली आहे म्हणून महाराष्ट्र शासना मार्फत औद्योगीक प्रकल्प (एम.आय.डी.सी. प्रकल्प) दादर गांवात राबवावा अशी मागणी होत आहे.तर या गंभीर प्रश्नाकडे लक्ष घालून उद्योग मत्री महसुल मंत्री यांची संयुक्त बैठक आयोजीत करण्याचे प्रयत्न करून, समन्वय साधून दादर गांवामध्ये औद्योगीक विकास महामंडळाचे मार्फत औद्योगीक प्रकल्प आणून गांवाचा विकास साधावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# कल्याण पूर्व पुना लिंक रस्त्यावर डंपरची डिवायडरला धडक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील पुना लिंक रोडवर विजय नगर परिसरात डंपरने रस्त्यामधील डिवायडरला धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात सुदैवाने जिवित हानी झाली नाही. कल्याण पूर्वेतील पुनालिंक रस्त्यावर विजयनगर परिसरात रस्त्यामधील डिव्हाडरला डंपर चालकाचे नियंत्रण सुटल्याने डंपर डिव्हायडर वर चढला. ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने आज रविवार असल्याने या रस्त्यावर दुपारच्या सुमारास वर्दळ कमी होती. त्यामुळे कोणतेही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही. दरम्यान कल्याण पूर्वेकडे पुन्हा लिंक रोडवर काटेमानवली ते विजयनगर दरम्यान अपघाताच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेणाऱ्या अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या वाहनांवर कारवाई कारवाई करावी यासह या रस्त्यावरील अपघातांवर नियंत्रणासाठी वाहतूक पोलिसांनी व महापालिका प्रशासनाने ठोस पावले उचलावीत अशी मागणी नागरिकांकडून केले जात आहे.




या संदर्भात मनसे पदाधिकारी योगेश गव्हाणे यांनी या अपघात घटनेमुळे संदर्भीत रस्त्यावर धावणाऱ्या अवजड वाहनांचा वाहतूक प्रश्नी प्रशासनाने लक्ष देत योग्य ती कारवाई केली पाहिजे. अन्यथा यासंदर्भात आंदोलन करणार असल्याचा इशारा मनसे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी यानिमित्ताने दिला आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# भिवंडी लोकसभेत नवीन राजकीय समीकरणे

## नीलेश सांबरे,साईनाथ तारे यांची वाढती जवळीक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : ठाणे जिल्ह्यातील एक महत्त्वाचा मतदारसंघ असलेल्या भिवंडी लोकसभेत नव्या राजकीय समीकरणाची नांदी होताना दिसत आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भिवंडी लोकसभा संपर्कप्रमुख साईनाथ तारे आणि जिजाऊ सामाजिक संस्थेचे प्रमुख निलेश सांबरे यांच्या वाढत्या भेटीगाठी मोठ्या चर्चेचा विषय ठरल्या आहेत. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर साईनाथ तारे आणि निलेश सांबरे यांच्यातील ही जवळीक नव्या राजकीय बंधनाचे द्योतक असल्याचे बोलले जात आहे.

भिवंडी लोकसभेतील राजकीय परिस्थितीचा विचार करता गेल्यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत निलेश सांबरे यांनी अपक्ष निवडणूक लढवली असतानाही तब्बल अडीच लाखांच्या आसपास मते घेतली होती. तर साईनाथ तारे हेज्या पक्षाचे नेतृत्व करत आहेत त्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाची भिवंडी लोकसभा मतदारसंघात सुमारे ३ ते ३.५ लाख मते आहेत. साईनाथ तारे आणि निलेश सांबरे हे एकत्र आले तर आगामी निवडणुकीत मतांचा हा आकडा 6 लाखांचा टप्पा पार करू शकतो.

आणखी खोलात जाऊन राजकीय समीकरणाचा विचार केल्यास निलेश सांबरे हे कुणबी समाजाचे आहेत. तर साईनाथ तारे हे आगरी समाजाचे असून तारे ह्यांचे आगरी, कोळी , कुणबी, आदिवासीं,खानदेशी, मुस्लिम, बहुजन अशा सर्व समाजांत एक वेगळे स्थान आहे. त्यासोबतच ठाणे जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांशी तारे यांचे घरोब्याचे संबंध आहेत. एक मितभाषी, अजातशत्रू व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख आहे. तर निलेश सांबरे यांनाही कुणबी, आदिवासीं आणि बहुजन समाजामध्ये मानाचे स्थान असून आपल्या सामाजिक उपक्रमांमुळे हा समाजही त्यांच्याशी चांगला जोडला गेला आहे.

सांबरे यांनी जिजाऊ संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत ठाणे, पालघर, रत्नागिरी अशा विविध जिल्ह्यांत समाजातील सर्व घटकांसाठी वैद्यकीय, शैक्षणिक, रोजगार, व्यवसाय सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. इतकेच नाही तर महिलांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी लघू उद्योग प्रशिक्षण आणि रोजगार निर्मितीसाठीही जिजाऊ संस्थेच्या माध्यमातून मोठी मदत केली आहे. त्यातच गेल्या काही दिवसांपासून निलेश सांबरे आणि साईनाथ तारे यांच्यात वाढलेल्या भेटीगाठींनी अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या दोन्ही नेत्यांचे असणारे राजकीय स्थान, सामाजिक ताकद आणि पाठशी असणारी मतांची आकडेवारी पाहता या दोन नेत्यांच्या एकत्र येण्यामुळे भिवंडी लोकसभेतील एका नव्या राजकीय समीकरणाची नांदी होताना दिसत आहे. ज्या बदलांचे संकेत या नेत्यांच्या सततच्या गाठीभेटीतून स्पष्टपणे जाणवत आहेत. त्यांची ही राजकीय जवळीक आणखी कुठपर्यंत जाते हे येणाऱ्या काळातच स्पष्ट होईल.

# ट्रकच्या धडकेत मुलाचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील राया गाव, खडवली रस्त्यावर शनिवारी सायंकाळी सुमारे ६:३० वाजण्याच्या सुमारास एक हृदयद्रावक अपघात घडला. टिटवाळा येथून रायगावच्या दिशेने जात असताना एका निष्काळजी ट्रक चालकाने भरधाव वेगात वाहन चालवत एका मोटारसायकलला जबर धडक दिली. या अपघातात सहा वर्षीय जिग्नेश निकेश राऊत या निष्पाप बालकाचा जागीच मृत्यू झाला. अपघातग्रस्त मोटारसायकलवर जिग्नेश त्याची आई पुनम राऊत आणि आजोबा विजय गटल्या पाटील हे तीन जण प्रवास करीत होते.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विजय गटल्या पाटील (वय ५८ वर्ष, रा. आणे, पो. पडघा, ता. भिवंडी) हे आपल्या मालकीची मोटारसायकल (क्रमांक MH04 EM 2980) चालवून रायागावमार्गे टिटवाळ्याकडे जात असताना, रायागाव बसस्टॉपजवळील वळणावर टिटवाळ्याच्या दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या टाटा ट्रक (क्रमांक MH07 C 1000) ने जोरदार धडक दिली. ट्रकचालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून मोटारसायकलला जबर धक्का दिला, त्यात जिग्नेश याच्यावरून ट्रकचे पुढील चाक गेले व त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेत पुनम राऊत व विजय पाटील यांना किरकोळ दुखापत झाली असून मोटारसायकलचेही मोठे नुकसान झाले आहे.

अपघात घडल्यानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी ट्रक जप्त केला असून आरोपी चालकाविरोधात कल्याण तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर करण्यात आला आहे. गुन्हा रजिस्टर क्रमांक २१३/२०२५ अंतर्गत भारतीय न्यायसंहितेचे कलम १०६(१), २८१, १२५(ए), १२५(बी) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार कलम १८४ व १८७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून निष्पाप जिग्नेशच्या मृत्यूने त्याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक प्रदीप कदम करत आहेत. अपघातानंतर वाहनचालक फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. संबंधित चालकावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व नातेवाईकांनी केली आहे.

## जलपर्णी काढण्याच्या कामामुळे केडीएमसी क्षेत्रात पिवळसर पाणी पुरवठा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका उल्हास नदीतून पाणी उचलून बारावे जलशुद्धीकरण केंद्रातून कल्याण पूर्व व पश्चिम विभागातील नागरिकांना पाणी वितरित करते. उल्हास नदी पात्रामध्ये मोठ्या प्रमाणात जलपर्णी वनस्पती वाढलेली आहे. हि जलपर्णी वनस्पती मशिनद्वारे काढण्याचे काम सुरू असल्याने जलपर्णीच्या मुळाशी असलेल्या गाळामुळे पाणी पिवळसर दिसत आहे. तसेच पाण्याला थोडासा वास येत आहे. महानगरपालिकेच्या बारावे जलशुद्धीकरण केंद्रातील पाण्यामध्ये क्लोरीनची मात्रा योग्य ठेऊन पाणी शुद्ध केले जात आहे. तथापि पाण्याचा कलर पिवळसर असल्याने नागरिकांनी घाबरून न जाता हे पाणी गाळून व उकळून वापरण्याची खबरदारी घ्यावी व महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.

## सहा महिन्यातच चेंबर्सची झाकणे तुटली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पूर्वेकडील एमआयडीसी निवासी भागातील वंदेमातरम उद्यान समोर सर्व्हिस रोडवरील पाण्याच्या पाईपलाईन वरील चेंबर्सची झाकणे तुटली असून त्यात एखाद्या वाहनाचा अपघात होऊन दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. या परिस्थितीचे मात्र एमआयडीसीला त्याचे काही सोयरसुतक नाही असे दिसत आहे. भविष्यात. तुटलेल्या झाकणे परिसरातील लोकांसाठी अपघाताला आमंत्रण देत आहेत अशी चर्चा होत आहे.

एमआयडीसी मधील सर्व्हिसरोड हा साधारण सातआठ महिन्यापूर्वी एमआयडीसीकडून बांधण्यात आला होता. एमआयडीसी ठेकेदाराने सदर रस्ता बनवल्यानंतर येथील रस्त्याच्या कडेला मेन पाण्याच्या पाईपलाईनवर जेथे इमारतींसाठी नळ जोडणी होते तेथे चेंबर्स बनवली होती. सदर ही चेंबर्स तकलादू व सुमार दर्जाची बनविल्याने या चेंबर्स वरील झाकणे ही त्यावर वाहने जावून सहा महिन्यातच तुटली असून आता जर एखादे वाहनाचे चाक त्यात फसून मोठी दुर्घटना होऊ शकते. याच रोडवर सद्या वाहतुकीचे प्रमाण वाढले असून कल्याण शिळ रोडवरील मेट्रो कामामुळे ट्रॅफिक जाम होत असल्याने बरीच वाहने या सर्व्हीस रोडचा उपयोग करतात. या बद्दल एमआयडीसीला येथील रहिवासी मुकुंद साबळे यानी या विषयी कळविले तरीही हा विषय दुर्लक्षित आहे. एखादा अपघात घडल्यावर प्रशासन जागे होईल का ? असे येथील नागरिक विचारणा करीत आहेत.

# खर्डीकरांना सोनाई-सिताई मातेच्या 'बोहाडा' यात्रेचे वेध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**अक्षयतृतीया बुधवार ३० एप्रिल रोजी येत असल्याने देवी देवीच्यावारी शुक्रवारी २ मे रोजी वाजतगाजत मंदिरात जाणार असून मोठा बोहाडा १ मे रोजी गुरुवारी रात्री भरणार आहे.यात्रेच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था चोख रहावी यासाठी लवकरच शांतता कमिटी,मोहल्ला कमिटी,मंदिर ट्रस्ट,राजकीय पक्ष,संघटना व सामाजिक कार्यकर्ते यांची सभा घेण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर व सहायक पोलिस निरीक्षक शिवकुमार जाधव यांनी सांगितले.**

शहापुर : ठाणे जिल्ह्यातील नवसाला पावणाऱ्या खर्डीच्या सोनाई-सिताई देवी यात्रेचे वेध भाविकांना लागले असून 27 एप्रिल ते 2 मे 2025 दरम्यान ही यात्रा(बोहाडा) संपन्न होत आहे.खर्डीच्या यात्रेला "बोहाडा"असेही म्हणतात.चैत्र शुद्ध पोर्णिमेला देवीच्या काठीचे (ढोलकाठी) गावात आगमन झाले असून ढोलकाठीची पूजा करुन मिरवणुकीने वाजत-गाजत देवीच्या मंदिरात आणली गेली. दुसऱ्या दिवशी पारंपरिक पद्धतीने गावातील भाविकांनी आपआपले कुलदैवतांची कै.शाम परदेशी यांच्या सोनाई फॉर्म हाऊस येथील आमराईत पूजा करून सामूहिक वनभोजन केले.यावेळी यात्रा शांततेत पार पाडण्याचे आवाहन खर्डी देवालय ट्रस्ट तर्फे करण्यात आले.

सामूहिक वनभोजन निमित्ताने यात्रेत परंपरागत देव-देवतांची पात्र घेणाऱ्या भाविकांची घरातील कूळ दैवतांची टाक आणून सामूहिक पूजा चर्चा केली जाते,त्यानंतर घरून आणलेले जेवण सामूहिकरित्या वनभोजन केले जाते.सोनाई-सिताई देवीची यात्रा सहा दिवस रात्रभर सूरू असते.यात्रेत पारंपरिक पदधतीने देवदेवतांची पात्ररूपी पात्रे नाचविली जातात.ऐन उन्ह्याळयात ही यात्रा होत आहे. रात्रीच्या वेळेस वीज पूरवठा खंडीत होउ नये यासाठी महावितरण कंपनीला व यात्रेत कुठलाही अनुचित प्रकार घडु नये यासाठी कायदा-सूव्यवस्था चोख राहण्यासाठी,इतर सूविधा मिळण्यासाठी व भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी खर्डी देवी मंदिर देवालयातर्फे ग्राप खर्डी,तहसीलदार,पोलीस निरीक्षक, महावितरण,ग्रामीण रुग्णालय व गटविकास अधिकारी यांना खर्डी देवालय ट्रष्टच्या वतीने निवेदन देण्यात येणार असल्याचे यावेळी अध्यक्ष गणेश अधिकारी,उत्सव कमिटी अध्यक्ष नरेश अधिकारी, सदस्य विजय बागुल यांनी यावेळी सांगितले.



यात्रे निमित्ताने आयोजित केलेल्या सामूहिक वनभोजनावेळी उत्सव कमिटी अध्यक्ष नरेश अधिकारी,मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष गणेश अधिकारी,विजय बागुल,अरुण पातकर,प्रदीप सारंगधर,पुजारी उदय भदे,धनंजय बागुल,सचिन सारंगधर,प्रवीण अधिकारी। ताराचंद मराडे व रोहन अधिकारी आदी भाविक उपस्थित होते.

## भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांना केडीएमसीतर्फे आदरांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्या पुण्यतिथी दिनी आज कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. महापालिका मुख्यालयात शिक्षणाधिकारी विजय सरकटे, यांनी भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी उपस्थित सहा.माहिती व जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत व इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून आदरांजली वाहिली.

## आर्यनने २० किलोमीटर सागरी अंतर केले ५४ मिनिटात पार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : शहरातील ओमकार इंटरनॅशनल शाळेतील आर्यन राजेश खेडेकर या १४ वर्षाच्या विद्यार्थ्याने नवी मुंबई समुद्र परिसरातील प्रॉन्ग्ज लाईट हाऊस ते अटल सेतू उड्डाण पूल हे २० किलोमीटरचे सागरी अंतर जलतरण करून तीन तास ५४ मिनिटात पूर्ण केले आहे.

आव्हानात्मक परिस्थितीत आर्यन खेडेकर याने हे अंतर पूर्ण केले. त्याच्या या साहसी पराक्रमाचे कौतुक ओमकार शाळेतील शिक्षक त्याचप्रमाणे येथील विविध क्षेत्रातील लोकांनी केले.

आर्यनला लहनपणापासून पोहण्याची आवड होती. यामुळेच पालकांनी जलतरणचे प्रशिक्षण सुरू केले होते. अभ्यासाबरोबर तो पोहण्याचे प्रशिक्षण नियमाने घेत होता. आर्यनने प्रॉन्ग्ज लाईट हाऊस ते अटल सेतू उड्डाण पूल दरम्यानचे अंतर पोहून पार करायचे असे निश्चित केल्यानंतर तो अनेक महिन्यांपासून हे अंतर ठरलेल्या वेळेत पार करता येईल स्थानिक पातळीवर सराव करत होता. हे अंतर पार करण्यासाठी येणारे वेगवान समुद्री वारे, जलतरणातील खडकांचे अडथळे त्यावर मात करत जलतरण अशा खडतर परिस्थितीत कसे करायचे याचा अभ्यास आर्यन खेडेकर याने केला होता. यासाठी त्याला त्याच्या प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले होते.

## 'आपले सरकार'साठी अर्ज करा जिल्हाधिकारी यांचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यातील सध्या रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रिक्त असलेल्या सर्व आपले सरकार सेवा केंद्रासाठी इच्छुक नागरिकांनी https://raigad.gov.in या संकेत स्थळावरून देण्यात आलेल्या ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरून आवश्यक असलेली सर्व कागदपत्रांसह आपला अर्ज १५ मे रोजी सायं. ०६.१५ वा. पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय,अलिबाग येथे जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपंचायत क्षेत्रात किमान २ केंद्र स्थापन करण्यात येतील, मात्र ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या (२०११ च्या जनगणनेनुसार) किमान ४ केंद्रे स्थापन करण्यात येईल. शहरी भागासाठी आपले सरकार केंद्रासाठी महानगरपालिका व नगरपरिषद दहा हजार लोकसंख्येसाठी २ केंद्र स्थापन करण्यात करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले आहे.

# मनसे नगरसेवकाने वाचला आमदार राजेश मोरे यांच्यासमोर समस्यांचा पाढा



**प्रभागातील रस्ते , नाले, गटारे, जल वाहिन्या, पथदिव्यांच्या दुरुस्तीसाठी आमदारांचा पुढाकार**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : पूर्वेकडील एकतानगर विभागाचे माजी मनसे नगरसेवक राजन मराठे यांचा प्रभाग असलेल्या प्रभागात अद्यापि सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा नसून रस्ते, पथदिवे, पाणी, गटारे, नाले, पाणी यासारख्या मुलभूत समस्यांची वाणवा आहे. यामुळेच या समस्या सोडविण्यासाठी राजन मराठे यांनी आमदार राजेश मोरे यांच्याकडे पाठपुरावा केला. प्रभागातील समस्या जाणून घेण्यासाठी आमदार मोरे यांनी नुकताच या प्रभागाचा मनसे नगरसेवक राजन मराठे यांच्या समवेत दौरा करत या समस्या तातडीने सोडविण्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे.

नागरिकांना दैनदिन जीवन जगताना समस्या येतात. स्थानिक माजी नगरसेवक राजन मराठे यांच्यासमवेत अनेक लोकप्रतिनिधीनि या समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा केला होता. मात्र तरीही या समस्या कायम असून या भागातील सांडपाणी वाहून नेण्यासाठी यंत्रणा नसल्याने हे सांडपाणी रस्त्यावरून वाहत असून त्याची पसरणारी दुर्गंधी, उखडलेले अरुंद रस्ते, अपुरा पाणी पुरवठा, उघडी गटारे, तुंबलेले नाले यासारख्या समस्या शहराला खेटून असलेल्या या प्रभागात असल्यानेच अखेर माजी नगरसेवक मराठे यांनी आमदार राजेश मोरे यांच्याशी संपर्क साधत त्यांच्याकडे या समस्या मांडत त्या सोडविण्याची मागणी केली होती. नागरिकाची गरज लक्षात घेऊन आमदार मोरे यांनी या प्रभागाचा दौरा करत महापालिका अधिकारी आणि माजी नगरसेवक राजन मराठे, प्रभागातील नागरिक यांच्या समवेत बैठक आयोजित करून या समस्या तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, उपतालुकाप्रमुख राहुल गणपूले, शाखाप्रमुख आनंद अहिरे तसेच शिवसैनिक आणि मनसैनिक उपस्थित होते.

# पडघा येथील मंदीरात 'गजर किर्तनाचा सोहळा आनंदाचा' कार्यक्रमाचे चित्रीकरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील एका मंदिरात झी टॉकीज प्रस्तुत "गजर किर्तनाचा सोहळा आनंदाचा" कार्यक्रमाचे चित्रीकरण पुर्ण करण्यात आले.

वारकरी सांप्रदाय मंडळ पडघे यांच्या वतीने. ह. भ. प. श्रीराम महाराज पाटील जळगाव याचें भागवतावरील आधारीत "गोपीगीत" कथेचा कार्यक्रम बंधुजी महाराज समाधी मंदीर येथे घेण्यात आला हा कार्यक्रम "झी टॉकीज" वर प्रसारीत करता यावा म्हणुन शुभम प्रोडक्शन प्रमुख हेमंत पांचाळ त्याचे सहकारी सचीन कदम, चित्रीकरण डायरेक्टर सागर सांवत त्यांचे सहकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली कॅमेरामन, साऊंड, लाईट, सेंटीग, तत्रंज्ञ, कामगार, ड्रायव्हर अशा २१ जंणाची टीम चित्रीकरणासाठी पडघा येथे तळ ठोकून होती. सदर कार्यक्रमाचे दोन दीवस टप्प्या टप्प्यात १७ ते १८ एप्रिल रोजी चित्रीकरण करून पुर्ण करण्यात आले टी. व्ही, केबलवरील कार्यक्रम नागरीकांना आकर्षक वाटत असले तरी चित्रीकरणासाठी मोठी यंत्रणा काम करीत असते हे कार्यक्रमाचे चित्रीकरण करतेवेळी पडघेकरानी पहील्यादांच जवळुन अनुभवले यावेळी कथा ऐकण्यासाठी प्रेक्षकांना विनामूल्य प्रवेश देण्यात आला होता. सदर कथेचे प्रक्षेपण २५ एप्रिल पर्यंत झी टॉकीज वाहीनीवर" गजर किर्तनाचा सोहळा आनंदाचा" या कार्यक्रमात दररोज सकाळी ७=३० वाजता दाखवण्यात येणार असुन नागरीकांनी ते आवश्य बघावे असे आवाहन "वारकरी सांप्रदाय मंडळ" पडघे यांनी केले आहे.



# बनावट आरक्षण तिकीटांचा पर्दाफाश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने बुधवारी रात्री कुशीनगर एक्स्प्रेसवर छापा टाकून मोठ्या प्रमाणात बनावट आरक्षण तिकीटांचा पर्दाफाश केला. दक्षता पथकाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, कुशीनगर एक्स्प्रेसच्या दोन एसी डब्यांमध्ये 16 डुप्लिकेट तिकिटे आढळून आली, ज्यामध्ये 64 प्रवासी प्रवास करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, लोकमान्य टिळक टर्मिनसवरून गोरखपूरला निघालेल्या कुशीनगर एक्स्प्रेसवर दक्षता पथकाने छापा टाकला. एलटीटी ते आगतपुरी दरम्यान एसी कोच B1 आणि B8 मध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या ताब्यातून 16 डुप्लिकेट तिकिटे जप्त करण्यात आली आहेत. या तिकिटांवर 64 प्रवासी प्रवास करत होते. नियमानुसार दक्षता पथकाने संबंधित प्रवाशांकडून 1 लाख 20 हजार रुपयांचा दंड वसूल केला. डुप्लिकेट तत्काळ तिकिटे राजस्थान, बिहार आणि उत्तर प्रदेशमधून जारी करण्यात आली होती. ही तिकिटे मुंबईतील भायखळा, कुर्ला आणि गोविंद येथे छापण्यात आली होती.

तपासादरम्यान यातील काही तिकिटे व्हीआयपी कोट्यातूनही कन्फर्म झाल्याचे समोर आले आहे. बनावट तिकिटांसह पकडण्यात आलेले बहुतांश प्रवासी गोरखपूर आणि बस्ती येथे जात होते. याबाबत दक्षता पथकातील अधिकाऱ्याने सांगितले की, उन्हाळ्याच्या सुटीत विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. प्रवाशांना त्यांच्या मूळ गावी सहज पोहोचता यावे यासाठी रेल्वे प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. प्रवाशांनी तिकीट दलालांना बळी पडू नये. सध्या तिकिटांसाठी मोठ्या प्रमाणात पैसे आकारूनही दलाल प्रवाशांना बनावट तिकिटे देत आहेत.

## संक्षिप्त

# भाजपा डोंबिवली पूर्व मंडल अध्यक्षपदी मितेश पेणकर




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : भारतीय जनता पार्टी डोंबिवली पूर्व मंडलाच्या नवीन अध्यक्षपदी मितेश पेणकर यांची रविवारी 20 तारखेला पूर्व मंडल कार्यालयात निवडणूक अधिकारी शशिकांत कांबळे यांनी घोषणा केली. यावेळी माजी नगरसेवक तथा निवडणूक अधिकारी राहुल दामले यांच्यासह पूनम पाटील, संदीप पुराणिक, मिहीर देसाई, रविसिंग ठाकूर, सिद्धार्थ शिरोडकर, प्रकाश पवार, मावळते अध्यक्ष मुकुंद ( विशु) पेढणेकर आदी उपस्थित होते. पूर्व मंडल अध्यक्ष पदाकरता मितेश पेणकर यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. उपस्थित निवडणूक अधिकारी दामले यांनी पेणकर यांची नवीन अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा केली. पेणकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर होताच उपस्थित माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पेणकर यांना पेढे भरवून अभिनंदन केले. यावेळी शशिकांत कांबळे म्हणाले, महाराष्ट्रातील 1196 अध्यक्ष मंडळाची एकच वेळी निवडून पार पडली. अध्यक्षा पदासाठी 35 ते 45 वयोगट व 100 बूथ मध्ये एक अध्यक्ष असे असून दर तीन वर्षानी पक्षानतेगत निवडणूक होत असतात.तर राहुल दामले म्हणाले, भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात युवा नेतृत्व घडवण्यासाठी युवकांना मोठी संधी मिळाली. कार्याध्यक्ष चव्हाण नेतृत्वात तयार झालेला कट्टर भाजपा कार्यकर्ता, प्रामाणिक, कर्तृत्ववान, एकनिष्ठ, तरुण तडफदार युवा नेतृत्व मितेश पेणकर यांची भाजपा डोंबिवली पूर्व मंडल अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन व पुढच्या वाटचालीस शुभेच्छा. विशेष म्हणजे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष चव्हाण यांच्या तालमीत तयार झालेला मितेश वयाच्या 38व्या वर्षी भाजपा डोंबिवली पूर्व मंडळाचे नेतृत्व करणार आहे. मितेश ने पक्षाचे प्रमाणिकपणे काम केल्याने हे फळ मिळाले आहे यात काही शंकाच नाही.

# पडघा येथुन मुलगी बेपत्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील एक शिक्षण घेणारी मुलगी बेपत्ता झाली आहे.

पडघा पोलिस स्टेशन हद्दीतील मूळ गाव महाप, पो. पाच्छापुर ता. भिवंडी, सध्या राहणार बालाजीनगर पडघा येथील कृतिका सुभाष मते ( वय १९ ) ही मुलगी पडघा बाजारपेठेत भाजीपाला आणण्यासाठी गेली होती. ती घरी परतलीच नाही सगळीकडे शोध घेऊन सुद्धा ती सापडत नसल्याने अखेर ती हरवली असल्याची तक्रार मुलीच्या वडिलांनी पडघा पोलीस स्टेशन मध्ये नोंदवली आहे. रंगाने-गहूवर्ण, काळे लांब केस, माथ्यावर लाल लहान टिकली, अंगाने सडपातळ, ऊंची ५ फुट २ इंच, अंगात काळ्या रंगाचा हाफ टी शर्ट,निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, पायात काळ्या रंगाची सॅन्डल, मराठी, हिंदी भाषा बोलणारी अशा वर्णनाची मुलगी कुणाला दिसल्यास अथवा तिच्याबद्दल कुणाला काही माहिती असल्यास पडघा पोलीस स्टेशन अथवा 9967457796 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन पडघा पोलीस स्टेशनच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

## लाल मिरचीचा बाजारभाव घसरले

# घरगुती मसाल्याला गृहिणींची पसंती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : राज्यातील ग्रामीण व शहरी भागात तसेच आदिवासी पट्ट्यात सर्वसामान्यांच्या घरांमध्ये रोजच्या जेवणात लाल मिरच्या आढळून येते जेवणामध्ये कुठल्याही तिखट पदार्थ बनवायचा असेल तर लाल मिरची गरज लागतेच मिरची शिवाय तिखट पदार्थ बनवणे अशक्य आहे. त्यामुळे यंदा मागील वर्षापेक्षा लाल मिरचीचा बाजार भाव उतरल्याने लाल मिरची खरेदीसाठी सर्वच बाजारपेठेत खरेदीसाठी ग्रहणींची झुंबड उडालेली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

त्यामुळे ग्रामीण भागात लाल मिरचीला सतत दोन दिवस उन्हात सुकवून मसाला चक्कीवर दळण्यासाठी ग्राहकांनी येथे सर्व पसंती दिली आहे तसेच बाजारमधल्या विक्रीच्या मसाल्यापेक्षा घरगुती मसाल्याला ग्रहणींची सर्वात पहिली पसंती असल्याची प्रतिक्रिया कोरावळे येथील ग्रहणी तथा जय भवानी महिला बचत गट अध्यक्षा भाग्यश्री भालेराव यांनी दिली आहे.

हा मसाला वर्षाकाठी एकदाच दळला जातो. त्यामुळे ग्रामीण भागात वर्षाकाठी लाल मिरचीचा ठसका पहायला मिळत आहे. या वर्षी लाल मिरचीच्या बाजार भावात मोठी घट झाली आहे मात्र यावर्षी लाल मिरची दरात मोठी घट झाल्याची माहिती सरळगाव येथील व्यापारी मोतीराम कराले यांनी दिली आहे. सदर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी हा लाल मिरचीचा दळलेला मसाला शेतीच्या हंगामात विशेषता मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे ग्रामीण भागात या लाल मिरचीच्या मसाला हा अतिशय चविष्ट व चविदार असल्याकारणाने या लाल मिरचीचा मसाला दळण्यासाठी मुरबाड तालुक्यातील तुळई येथील बाळू कंटे यांच्या एकविरा आई दळण व मसाला गिरणीवर मोठ्या प्रमाणात मुरबाड मधील ग्राहक मसला दळण्यासाठी येताथ तर काही ठिकाणी मसाला गिरणीवर मसाला दळण्याचे एक किलो ला ४० ते ५० रुपये घेतले जातात. परंतु येथे बाळू कंटे यांच्या यांच्या मसाला गिरणीवर एक किलो ला पंचवीस रुपये घेतले जातात त्यामध्ये धणे,हळद हे सुद्धा दळले जातात याचाही एक किलोचा बाजारभाव पंचवीस रुपये आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना परवडणारा मसाला दळण्याचा बाजारभाव असल्याने सर्व ग्राहक या एकविरा आई दळण मसाला गिरणीचे सर्वत्र कौतुक करत आहेत.



**लाल मिरचीचे बाजार भाव पुढील प्रमाणे.**
**मिरचीचे वेगवेगळ्या जाती या वर्षी सन २०२५ चे बाजार भाव**

| | |
|---|---|
| पत्री मिरची | ₹ १४०/१३० किलो |
| लवंगी मिरची. | ₹ १६०/१५ किलो |
| बेडकी मिरची. | ₹१९०/१८० किलो |
| शंकेश्वरी मिरची. | ₹ १६०/१७० किलो |
| काश्मिरी मिरची. | ₹ ३०० किलो |
| ढोबळी मिरची. | ₹ ३२० किलो |

**मोतिराम कराले,गणेश किराणा दुकान सरळगाव/मुरबाड**

**मसाला बनवण्यासाठी लागणारे साहित्य पुढील प्रमाणे तेज पत्ता, धने, जावेत्री, रामफल, नाकेश्वर, कबाब चिनी, त्रीफळ, वेलची, दालचिनी, मिरी, लवंग, जायफळ, सायझिरा, दगडफूल, खसखस, सफेद तील, खडा हिंग, जीरा, मसाला वेलची, इत्यादी साहित्य मसाला बनवण्यासाठी वापरण्यात येत आहे. वरील साहित्य वापरल्यामुळे घरगुती मसाल्याची चांगली असते.घरगुती मसाला हा उन्हाळ्यात बनवतात संपूर्ण पावसाळ्यासाठी.**
**- भाग्यश्री भालेराव ,गृहिणी तथा अध्यक्षा जय भवानी महिला बचत गट कोरावळे कोरावळे/मुरबाड**

### वर्षाकाठी एकदाच चक्कीवर मसाला दळला जातो ही परंपरा आजही ग्रामीण भागात कायम!



यंदा मिरचीच्या घरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाले आहे. गृहणी मिरची विकत घेताना तालुक्यातील प्रमुख सरळगाव, धसई,टोकावडे ,म्हसा, मुरबाड या प्रमुख बाजारात चित्र पहायला मिळत आहे.तसेच बाजारात लाल मिरची विकत घेताना लाल मिरची प्रति किलो मागे १५०/२०० रुपयाचा बाजार भाव उतरला आहे. त्यामुळे यंदा लाल मिरचीत खरेदी करताना ग्रहणींना दिलासा मिळाला आहे.

मिरची खरेदी करण्याची मुरबाड तालुक्यातील प्रमुख बाजारपेठेत ग्राहकांची झुंबड उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# बल्याणीत रोजगार मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रातील ग्रामीण अ प्रभाग क्षेत्रातील युवक, युवती, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी प्राप्त होण्यासाठी बल्याणी प्रभागाचे माजी नगरसेवक मयूर पाटील यांच्या वतीने भव्य रोजगार मेळावा शनिवारी टिटवाळा येथे संपन्न झाला.



शहरातील सर्व सुशिक्षित तरुण तरुणींसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक मयूर पाटील यांच्या पुढाकाराने भव्य रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होते. टिटवाळा पूर्व मांडा येथील प्रथमेश मंगल कार्यालयात पार पडलेल्या या रोजगार मिळाव्यात सकाळपासूनच तरुण तरुणींची एकच गर्दी दिसून आली. शेकडो बेरोजगार तरुण-तरुणींना विविध कंपन्यांमध्ये कामाचे अपॉइंटमेंट लेटर मिळाल्याचे मयूर पाटील यांनी सांगितले. या मेळाव्यात फ्लिपकार्ट, मिंत्रा, आणि बीटीएस कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.या भव्य रोजगार मेळाव्या निमित्ताने 200हून अधिक जणांना रोजगारांच्या संधी या रोजगार मेळाव्यात प्राप्त झाल्या.

# जिल्ह्यातील स्मार्ट पोलिस ठाण्यात वडखळला आय.एस.ओ.प्रमाणपत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : वडखळ पोलीस ठाणे जिल्ह्यातील स्मार्ट पोलीस ठाणे ठरले असून वडखळ पोलीस ठाण्याला ISO सर्टिफिकेट प्राप्त झाले आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याहस्ते सदर दोन्ही प्रमाणपत्र वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांना प्रदान करण्यात आले. वडखळ पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी प्रसाद पांढरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी वढखळ पोलीस ठाणे व परिसरात



नियोजनबद्ध आराखडा तयार करून तेथील कार्यरत अधिकारी, जमादार, पोलीस कर्मचारी यांच्यासह विविध उपक्रम राबविले. त्यांनी बजावलेले कर्तव्य व पोलीस ठाण्यात ठेवलेला नीटनेटकेपणा, स्वच्छता व अध्यावत अभिलेख ही कामगिरी यामुळेच वडखळ पोलीस ठाणे जिल्ह्यातील स्मार्ट पोलीस ठाणे ठरले आहे. तसेच वडखळ पोलीस ठाणे ISO सर्टिफिकेट प्राप्त करणारे पोलीस स्टेशनं ठरले आहे.

हे यश मिळाले आहे ते सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या सहकार्यामुळेच मिळाले असल्याचे वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी सांगितले. वडखळ पोलीस ठाण्याला मिळालेल्या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे




# वेल्फेअर फाऊंडेशनची आंतरराष्ट्रीय धम्म परिषद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : बुद्ध रत्न सागर सोशल वेल्फेअर फौंडेशन (रजि) आयोजित तिसरी आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषद व परम पूज्य विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्तिकलशाची भव्य मिरवणूक आणि दर्शन सोहळ्याचे आयोजन रविवार दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या कालावधीत गांधी मेमोरियल हॉल निजामपूर रोड, दत्त नगर, माणगाव जि. रायगड या ठिकाणी करण्यात आली आहे. सदर आंतरराष्ट्रीय धम्म परिषद आणि अस्थी दर्शन सोहळयास तमाम धम्म अनुयायी उपासक, उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेचे प्रमुख आयोजक भदंत रत्नप्रिय थेरो यांनी तमाम धम्म वत्सल समाजाला आवाहन केले आहे.




**कार्यक्रमाची रूपरेषा**

सकाळी ९:०० वा. धम्म ध्वजारोहण

सकाळी १०:०० वा. परम पूज्य विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी कलशाची भव्य मिरवणूक,

दुपारी १२:०० वा. भिख्खू संघास भोजन दान, दुपारी १:०० वा. धम्म परिषदेचे उदघाटन व स्वागत समारंभ,

दुपारीः २:०० वा. भिख्खू संघाची धम्म देसना, ते सांय. ४:०० वा. मान्यवरांचे मनोगत आणि गौरव सोहळा,

सायंकाळी ४:०० वा. ठराव धम्म पालन गाथा, सायंकाळी ५:३० वा. धम्म परिषदेची सांगता.

**धम्म परिषदेस प्रमुख उपस्थिती**

भदंत शांतिरत्न महायेरो प्रमुख मार्गदर्शक तथा अध्यक्ष भिक्खू संघ मुंबई, पूज्य भदंत के आर लामा प्रमुख मार्गदर्शक पु. दलाई लामांचे शिष्य, पू. भदंत डॉ. राजरत्न येरो प्रमुख मार्गदर्शक वर्धा, भदंत रत्नप्रिय थेरो (प्रमुख आयोजक आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषद), डॉ. अनिलकुमार व. गायकवाड ( एम एम आरडीसी) आयु. अक्षय आंबेडकर (डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतु ) आयु, रोहित पिसाळ ( सुप्रसिद्ध अंडर वॉटर गोल्ड मायनिंग उद्योजक )

**सदर आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेस पूजनीय भिक्खू संघाची उपस्थिती**

पू.भदंत बोधीशील थेरो (मुंबई), पू. भदंत सुगत थेरो (नाशिक), पू. भदंत आर आनंद थेरो (कोल्हापूर), पू.भदंत एस संबोधी थेरो (कोल्हापूर), पू.भदंत धम्मज्योती थेरो (संभाजी नगर), पू. भदंत शांतिदुत थेरो (संभाजी नगर), पू.भदंत राहुल बोधी थेरो (बदलापूर), पू. भदंत मास्टर झेन (नागपूर), पू.भदंत संघरत्न थेरो (नाशिक), पू. भदंत राहुलरत्न थेरो (अंबरनाथ), पू.भदंत महा मोगलायन थेरो (उल्हासनगर), पू.भदंत यशपाल थेरो (मुंबई), पू.भदंत बोधिरन (संभाजी नगर), पू. भदंत पूर्ण (नवी मुंबई), पू.भदंत अश्वजित (मुंबई), भदंत मिलिंद बोधी, पू. भदंत काश्यप, पू.भदंत रिंचेन (ठाणे), पू. भिक्खूनी उत्पल वर्मा इत्यादी पूजनीय भिक्खू संघ उपस्थित राहणार आहेत.

# प्रतीक शर्मा शिवसेना सोशल मीडिया उप राज्यप्रमुखपदी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना पक्षाच्या बांधणीसाठी एकनाथ शिंदे यांनी कंबर कसली असून सर्वच माध्यमातून पक्षाला बळकटी देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोशल मिडीयाच्या माध्यमातून पक्ष तळागाळात पोहोचवण्यासाठी एकनाथ शिंदेंनी सोशल मिडीयाच्या उप राज्यप्रमुखपदी सध्या पक्षाचा सोशल मिडीया सांभाळणारे प्रतिक शर्मा यांची नियुक्ती केली आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश होत आहेत. राज्यभरातून विविध पक्षाचे नेते, माजी आमदार, माजी खासदार, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्यांपासून सरपंचांपर्यंत अनेकांनी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेते प्रवेश केला आहे. शिवसेनेच्या पक्षबांधणीसाठी एकनाथ शिंदे यांनी महत्वाचे निर्णय घेतले आहेत. समाज माध्यमांत पक्षाचा मोठा जनाधार आहे. सोशल मिडीयाच्या माध्यमातून पक्षाची ध्येय धोरणे, निर्णय, महत्वाचे उपक्रम आणि पक्षाची भूमिका पोहोचोवण्याचा प्रयत्न केला जातो.



यातच आता सोशल मिडीयाची आघाडी आणखी मजबूत करण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी नवी नियुक्ती केली आहे. शिवसेना पक्ष, एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे माध्यम सल्लागार असलेले प्रतिक शर्मा यांची शिवसेनेच्या सोशल मिडीया महाराष्ट्र उप राज्य प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रतिक शर्मा हे गेल्या अनेक वर्षांपासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि शिवसेना पक्षाचे सोशल मिडियाचे काम पाहत आहेत. शिवसेनेच्या अनेक महत्वाच्या सोशल मिडिया मोहिमांमध्ये शर्मा यांचा सहभाग होता. लोकसभा विधानसभा निवडणुकांमध्येही डिजिटल मीडियाची संपूर्ण जबाबदारी प्रतीक शर्मा यांच्यावर होती.

प्रतिक शर्मा हे मुळचे अंबरनाथकर असून त्यांचे शिक्षण भाऊसाहेब परांजपे महाविद्यालयातून झालेले आहे. मुंबई विद्यापीठात पत्रकारितेचे प्रशिक्षण घेतल्यानंतर शर्मा यांनी एनडीटीव्ही, झी चोवीस तास अशा वृत्तवाहिन्यांमधून त्यांनी कामही केले आहे. माध्यम क्षेत्रातील अनुभवी व्यक्तीची या पदावर निवड केल्याने पक्ष संघटनेला त्याची मदत होईल, असे बोलले जाते.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024